९५५४२०/०२

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुवि
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 17 JUL 2004

प्रति,

शिक्षण प्रमुख
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे.

**विषय** : सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम - इंग्रजी). . .

**संदर्भ** : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक व्हीएलएस-२००४/(२६०/२००४)/प्राशि-३. दिनांक २२ जून. २००४

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व संपूर्ण पत्ता | प्रस्तावित शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | पैच्याराम शिसराम शिक्षण संस्था स.नं. ३४ अ, प्लॉट नं. ६ व ७ नगररोड, पुणे-१४ | नगररोड, पुणे १४ | इंग्रजी | १ ली |

**कायम विनाअनुदानीत**

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३ सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेश समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता.)

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. मा. अध्यक्ष/सचिव, पैच्याराम शिसराम शिक्षण संस्था स.नं. ३४ अ, प्लॉट नं. ६ व ७ नगररोड, पुणे-१४

कायम विनाअनुदान तत्वावर/
~~विनाअनुदान तत्वावर/~~

जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा./पुवि/२० ०६
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 18 APR 2006

प्रति

१. ~~शिक्षणाधिकारी (प्राथमिक),~~
~~जिल्हा परिषद,~~

२. शिक्षण प्रमुख/~~प्रशासन अधिकारी~~
महानगरपालिका/~~नगरपालिका~~ शिक्षण मंडळ, पुणे.

<u>विषय</u> : सन २००४- २००५ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत. (माध्यम इंग्रजी )

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/ २००४ ( २६० / २००४)/प्राशि-३, दिनांक २२ जून २००४.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००४ पासून इ. १ ली च्या वर्गास ----- फक्त सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात ~~प्रथम सुरु/ असलेल्या वर्गावर~~ शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान/तत्वावर/कायम/विनाअनुदान तत्वावर/ परवानगी देण्यात येत आहे.~~ ~~क्रमे/~~ इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १] | भैय्याराम शितराम शिक्षण संस्था स.नं. ३४ अ प्लॉट नं. ६ व ७ नगररोड कायम विना अनुदान | नगररोड, पुणे-१४. | १ ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम

आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

**१. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.**
**२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**
**३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**
**४. मा. सचिव/अध्यक्ष,**
भैय्यराम शिवराम शिक्षण संस्था, स. नं. ३४ प्लॉट नं. ६ व ७, नगररोड.

कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना, शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा /१८२४/०६-०८
दि. ३/७/०६

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल
कारगील विजयनगर नागरोड पुणे-१४

विषय- कायम विनाअनुदानित तत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि-३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | इ. २री | नैसर्गिक प्रथमवर्ग | जून २००५ |
| | | इ. ३री | नैसर्गिक प्रथमवर्ग | जून २००६ |

अटी व शर्ती:-

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५. सदरशाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करु नये.

(स्वाक्षरी)
शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षणमंडळ कार्यालय,पुणे मनपा.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना,शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा ९२८४
दि. ७/७/०८

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
सेंट. जोसेफ. कॉन्व्हेंट स्कूल,
पुणे. नगर. रोड, पुणे -१४.

विषय- कायम विनाअनु दानित तत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि -३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | इ- ४ थी | नैसर्गिक प्रथम वर्ग | जून २००८. |

**अटी व शर्ती:-**

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदरशाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

(सही)
शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र. ४५७० /खाप्राशा/ ०८ - ०९
पुणे, दिनांक — २९ . ७ . २००८

## ना हरकत प्रमाणपत्र

विषय : इ.५वी प्रथम वर्ग सुरू करणेस परवानगी देणेबाबत.

संदर्भ : १) तुमचेकडील दि. ९/७०/०८ चा प्रस्ताव

२) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि.१०.१.०६

३) शालेय शिक्षण विभाग व्हीएलएस/२००२/(२०००/०२)/प्राशि-३ दि.२३.९.२००२

४) मा.शिक्षण मंडळ ठराव क्र.४९ दि.२३.६.०८

उपरोक्त संदर्भ क्र.२ व ४ च्या शासन निर्णयातील नियमांचे पालन करणेचे अटीवर तुमचे अनुदानित/ विनाअनुदान/कायम विनाअनुदानीत मराठी/ उर्दू / इंग्रजी माध्यमाच्या शाळेस जून २००८ पासून इ.५वी च्या प्रथम वर्गास विनाअनुदान/कायम विना अनुदान तत्वावर सुरू करणेस संदर्भ क्र.४ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देणेत येत आहे.

सदरचा दाखला तुमचे मागणीवरून देणेत येत आहे.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका.

प्रति,
संस्थापक/मुख्याध्यापक,
मैथ्यारामू सिसरामू शिक्षण संस्था
सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल
वडगावशेरी, पुणे-नगर रोड
पुणे १४.

C:\Masters\Shri\KADARE.doc463

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना,शिवाजीनगर, पुणे
जा.क्र./खाप्राशा/२०४१०
दिनांक ५-८-०८

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल
वडगाव शेरी, पुणे-नगर रोड, पुणे-१४

विषय - कायम विनाअनुदानिततत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ - शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.एल.एस. १००४ प्राशि- ३ दि. २१/७/२००८

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक/~~अतिरिक्त तुकड्या~~/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | इंग्रजी | इ. ६वी | वर्ग | जून २००८ |

अटी व शर्ती -

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजुर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

(सही)
शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

५१०८

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना,शिवाजीनगर, पुणे
जा.क्र./खाप्राशा/ ७७७३
दिनांक 26 DEC 2008

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल,
नगररोड, पुणे-१४

विषय - कायम विनाअनुदानिततत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ - शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.एल.एस. प्राशि- ३ दि.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | इंग्रजी | इ. ७ वी | प्रथमवर्ग | ~~जून २००३~~ जून २००९ |

अटी व शर्ती -

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.

२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६. सदर मंजुर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

(स्वाक्षरी)
शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

Maharashtra State
Board of Secondary & Higher Secondary Education
S.R. No. 832 A, Fainal Plat No. 178, 188,
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व्हे नंबर-८३२ अे,फायनल प्लॉट नं.१७८,१८९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.

Phone No.:- 020-25705000, Telegram:- MAHABOSEC,PUNE. Fax No.:- 020-25665808.

जा.क्र.रा.मं./परीक्षा-५/५२८२ दिनांक:- ११/०८/२०१०

प्रति,

मा.शिक्षण संचालक,
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय :- इंग्रजी माध्यमाच्या ज्या शाळांमध्ये इ.७ वी पर्यंतचे वर्ग सुरू आहेत अशा शाळांमध्ये इ.८ वी ते १० वी अथवा इ.८ वी ते १२ वी पर्यंतचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत.**

**संदर्भ :-**
**१) शासनाचे क्र.नमाशा-२०१०/(९६/१०)/ माशि-१,दिनांक १०/०३/२०१० चे पत्र**
**२) शासनाचे क्र.संकीर्ण-२००९/(२९४/१०)/ माशि-१,दिनांक ०१/०७/२०१० चे पत्र**
**३) या कार्यालयाचे शासनास दिलेले क्र.रा.म./परीक्षा-५/४८६९, दिनांक २३/०७/२०१० चे पत्र**

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्र क्र.१ नुसार शासनाने इंग्रजी माध्यमाच्या ज्या शाळांमध्ये इ.७ वी पर्यंतचे वर्ग सुरू आहेत अशा शाळांमध्ये इ.८ वी ते १० वी अथवा इ.८ वी ते १२ वी पर्यंतचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यास परवानगी देण्याच्या अनुषंगाने माध्यमिक शाळा संहिता व राज्य मंडळ अधिनियमामध्ये आवश्यक ते बदल करून, तसेच सीबीएसई मंडळाच्या धर्तीवर संलग्नता प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपध्दतीचा अभ्यासकरुन शाळांना दयावयाच्या प्रोव्हीजनल व रेग्युलर ॲफीलिएशन देण्याचे निकष व त्याचे प्रारूप. आकारावयाचे शुल्क, तसेच शाळांची तपासणी करण्याकरीता नेमावयाची इन्स्पेक्शन समिती इत्यादींचा अभ्यास करून त्याचा अहवाल सादर करण्याविषयी कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने मंडळाने सक्षम समितीच्या मान्यतेने वरील बाबींचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत केली होती. तसेच या समितीने सादर केलेल्या अहवालावर विभागीय मंडळांचे अभिप्राय मागविण्यात आले होते. समितीने दिलेल्या अहवालातील कायदेशीर अडचणी, प्रशासकिय अडचणी व प्रामुख्याने एकाच माध्यमाच्या विशिष्ट प्रकारच्या शाळांसाठी अवलंबावयाची वेगळी कार्यपध्दती घटनेच्या कलम १४ मध्ये नमूद केलेल्या समानतेच्या तत्वाशी विसंगत ठरणार असल्यामुळे यापूर्वीची कार्यपध्दती (म्हणजेच शासनाने परवानगी देणे. शिक्षण खात्याने मान्यता देणे व त्यानंतर शिक्षण विभागाच्या शिफारशीनुसार विभागीय मंडळांनी मान्यता व सांकेतांक देणे) अवलंबणे योग्य ठरेल व त्यामुळे कायदेशीर समस्या निर्माण होणार नाहीत असे अभिप्राय दि.२३/०७/२०१० च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेले होते. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व

--२--

Phone No.:- 020- 25705000. Telegram:- MAHABOSEC.PUNE. Fax No.:- 020-25665808.



क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२६ जुलै, २०१० रोजीच्या बैठकीत तत्वत: मान्यता मिळालेली आहे, व मंडळास प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव मा. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

तेंव्हा ही बाब विचारात घेवून मंडळाकडे इ.८ वी ते १२ वी पर्यतचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत प्राप्त झालेले सर्व प्रस्तावावर प्रचलित पध्दतीनुसार कार्यवाही होण्यासाठी मंडळास प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव आपणाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहेत(सोबत यादी जोडली आहे.) कृपया पोच दयावी.

आदेशान्वये,

आपला विश्वासू,

प्र. सचिव

राज्यमंडळ, पुणे-४

**प्रत माहितीसाठी-**

विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे

**प्रत माहितीसाठी तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी-**

संबंधित संस्थाप्रमुख/मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, शासनाकडून/आपणांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव मा.शिक्षण संचालक. (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले असून यापुढे कृपया त्यांच्याशी संपर्क साधावा.

Exam-5(imp)

३।६।६

महाराष्ट्र शासन

<u>शासन परवानगी आदेश</u>

क्रमांक इंमाशा २०१०/३६ /१०/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक ~~[struck]~~ २०१०.
१७ मे,

प्रति,

**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
शिवाजीनगर, पुणे.

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्रार्थमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते १२ वीचे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०.३.२०१०.
२) संस्थेचा दि. २९. ३.२०१० रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **भैय्याराम सिसराम शिक्षण संस्था, नगररोड, पुणे** या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या **सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल, नगररोड, पुणे** येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते इ.१२ वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.
२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.
३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकरक राहील.
६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १२ वीच्या वर्गांमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.
७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(डॉ. सुवर्णा सि.खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री(शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे / शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद , पुणे
सचिव, **भैय्याराम सिसराम शिक्षण संस्था, नगररोड, पुणे** निवड नस्ती, माशि-१.

E:\rekha\note\NEW ENG PERMENG NEW bhayyaram siva Pune3-4-10